# नवनाथांची आरती

जयदेव जयदेव जय श्री नवनाथा हो, स्वामी नवनाथा ।

भावार्ते आरती ओवाळू आरती श्रीगुरुदेवदत्ता ॥ जयदेव जयदेव ॥ धृ ॥

कलियुगी अवतार नवनाथांचा । केलासे उद्धार भक्तजनांचा ।

दावीला मूळमार्ग शाबरी विद्येचा । आगळा महिमा न कळे स्वामी सिद्धांचा ॥ १ ॥

मच्छीपासूनि झाले स्वामी मच्छिंद्र । गोरक्ष जन्मले गोवर भस्मात ।

जालंदर उत्पत्ति यज्ञकुण्डात । कानिफ पैदास गजकर्णात ॥ २ ॥

जयाचे चरणापासूनी झाले चर्पटीनाथ । गहिनी गोपीचंद अडबंगनाथ ।

हरिणीने रक्षिले भर्तरीनाथ । पुढे चौऱ्यांशी सिद्धांचे गणित ॥ ३ ॥

कलीमध्ये नवनाथ प्रकटले । शाबरीविद्या देऊनि जग उद्धरिले ।

विद्येच्या प्रतापे सुरवर जिंकिले । नाथांच्या सेवेशी शरणागत आले ॥ ४ ॥

hinduismfacts.org